# मुंबई पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ पोट कलम १ व ३ अन्वये अधिसुचना

क्रमांक/विशा/मनाई आदेश/ ५ /२०११, दिनांक :– २५/०४/२०११

ज्या अर्थी ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हददीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्याकडून महागाई, वीज भारनियमन, व जनतेच्या विविध मागण्यासाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा इ. आयोजन केले जाण्याची दाट शक्यता आहे, तसेच दि. ०१/०५/११ रोजी महाराष्ट्र दिन, आंतरराष्ट्रीय कामगार दिन, दि. ०६/०५/११ रोजी अक्षयतृतीया, दि. १७/०५/११ रोजी बुध्दपौर्णिमा, इत्यादी सण व उत्सव साजरे होणार आहेत.

(अ) त्या अर्थी वरील घटनांच्या अनुषंगाने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मी, विनोद लोखंडे, पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर, मुंबई पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७(१) अन्वये जीवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी कायदा व सुव्यवस्था जोपासण्यासाठी खालील प्रमाणे मनाई आदेश देत आहे.

१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, लाठया किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तु बाळगणे. २) दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जमा करणे. ३) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे. ४) सार्वजनिक रितीने घोषणा देणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे इत्यादी. ५) व्यक्तीच्या किंवा प्रेताकृतीच्या प्रतिमेचे प्रदर्शन करणे. ६) सभ्यता अगर निती या विरुध्द असतील अशी किंवा राज्यातील शांतता धोक्यात आणतील, किंवा ज्यामुळे राज्यशासन उलथून पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक, प्रदर्शित करणे. (७) तसेच ५ किंवा पाचापेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इ. कृत्यांना या आदेशान्वये मनाई करीत आहे.

वरिल मनाई आदेश खालील व्यक्तींना लागू राहणार नाहीत.

" जो कोणी इसम सरकारी नोकर आहे, किंवा ज्यास वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्रे घेणे भाग पडेल, किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याने सुट दिलेली आहे."

सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागू राहणार नाहीत.

---

१) लग्न कार्यासाठी जमलेले लोक

२) प्रेत यात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका

३) सरकारी/निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेऱ्या येथे जमलेले लोक.

४) सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला जनसमुदाय.

५) पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदान केलेल्या पोलीस अधिका—यांनी परवानगी दिलेल्या सभा/मिरवणुका

६) सर्व शासकीय / निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडीत असलेले ठिकाण.

सदर मनाई आदेश दि. ०१/०५/२०११ रोजी ००.०५ वाजे पासून दि. ३१/०५/२०११ रोजी २४.०० वाजे पर्यंत अमंलात राहील. वरील मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुध्द मुंबई पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

दिनांक :— २६/०४/२०११

25/4/2011

( विनोद लोखंडे)

पोलिस सह आयुक्त, ठाणे शहर

शिक्का

प्रति,

१) सरकारी मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांना पुढील प्रसिध्दी होणा—या राजपत्रात प्रसिध्दीसाठी.

२) मा. सचिव (गृहविभाग) मंत्रालय, मुंबई

३) मा. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे यांना बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी

( सदर आदेशाच्या प्रती ठाणे पोलीस आयुक्त परिसरात सहज दिसेल अशा ठिकाणी दिसतील अशा रितीने लावून व ध्वनी क्षेपकाद्वारे जाहीर करुन, त्यांचा प्रसार करावा व तशा नोंदी पोलीस ठाणे दैनंदीनीत घ्याव्यात. )

प्रत

समन्वय अधिकारी - ६ ओ. प्र.

२) - "ई" पोलीस नोटीस प्रसिध्दीकामी -